म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ६८८

॥ श्री गजानन प्रसन्न ॥

# श्री समाज संघ संगीत मेळा

वर्ष तिसरें

# संवाद
# व
# पद्यावली

१९३८

( किंमत २ आणे )

काव्य ६८८
२१।१।३८

६८७२

REFBK-0005773
REFBK-0005773

मुद्रक — ... कृष्ण खाडिलकर, श्रीदत्तात्रय प्रि. प्रेस, १३ शेणवीवाडी, गिरगांव मुं. नं. ४

पब्लिशर—सिताबाई भुस्कुटे. घसवाडी ठाकुरद्वार मुं. २

# नंदादीपाच्या प्रकाशांतः—

लोकप्रियता व लोकटीका, या कात्रींत मेळे सांपडले आहेत. अशा वातावरणांत समाजसंघ संगीत मेळयाच्या चालकांच्या आग्रहाखातर नंदादीप ( संत दामाजी ) हा पौराणिक नाट्यसंवाद लिहिण्याचें धाडस केलें आहे.

प्रत्यक्ष प्रयोग पाहून व वाचून नंदादीपाच्या प्रकाशाचें हंसक्षीरन्यायानें, परिशीलन करण्याची रसिकवृंदांस विनंति आहे.

माझी ही पांचवी कृती जनताजनार्दनाच्या सेवेला सादर करण्याचा सुयोग लाभल्याबद्दल नंदादीपाच्या प्रकाशांत परमेश्वराला वंदन करितों.

गणेशचतुर्थी
शके १८६०

पुष्पविहारी.
चाळ १२ सी. झावबाची वाडी ठाकुरद्वार मुंबई

REFBK-0005773
REFBK-0005773

# परिचय

लेखक व कवि०—श्री. पुष्पविहारी

फीडल् व संवाद शिक्षक०—श्री. राजाभाऊ वाईरकर

पेटी मास्तर०—श्री राजाभाऊ वाईरकर

तबला मास्तर०—श्री. दत्तू जाधव

ड्रेसींग वगैरे०—श्री. पांडुरंग वैद्य

## मुलींची नांवें व भूमिका

दामाजी०—मा. सप्रे

मुजुमदार०—कु. विमल मुणगेकर

बादशहा०—कु. रंगू पेंडसे

श्वेतवर्ण०—कु. इंदू भागवत

गोकर्ण०—कु. तारा जोशी

मिठू०—कु. काशी ताटके

कादर०—कु. गुलाब चोणकर व लीला जोशी

विठूधेड०—कु. कुसुम पागडी

गंग्या०—कु कुसुम पागडी

## नाचांतील मुली

शंकर—कु. इंदू भागवत

पार्वती—कु. कमल मोदगी

### इतर

कु. सिंधु फाटक, कु. सिंधु पाताळे, कु. विमल जोशी

मेळयाच्या उत्कर्षासाठीं उत्साहानें भाग घेणाऱ्या या सर्व मंडळींचे आभार मानावे तेवढे थोडेच.

संस्थापक—सिताबाई भुस्कुटे.

## कवि:—पुष्पविहारी

### नमन पद नं. १

गणनाथ पदकमला । सुमनि करूं पूजना ॥ धृ ॥
वश होई जो स्तवनीं । मधु भजनिं शीरलीन ॥ १ ॥
भयताप हरि दुरितां । शिरीं वरद धरी करा
सुखदाई भजकांस । काळ मधु मंगला ॥ २ ॥

### पद नं. २

प्रभु आसरा पतिता जनां ।
हरि व्यसनीं अवनी त्राता ॥ धृ ॥
त्यजि मोहहा वैरी महा हा
करि नाश हा आठवा आतां ॥ २ ॥

### पद नं. ३

पार्वती माता अंकीं विराजती ।
जटा विभूति धारी भोळा
नंदी वहाना तारी तारी ॥ १ ॥
करीं डमरू हा त्रिशुल विराजे
भालीं चंद्रमा पशुपती गाजे
भक्त जना प्रभु आधीं सांवरी ॥ २ ॥

### पद नं ४

गुंगवी डोलवी वेणू नादें
छेडी मधुरा मंजु ताना कान्हा ॥
कुंजवनि त्या गोवत्साना
गोकुळवासी गोपगोपीना
घाली मोहिनी देवकी तान्हा
दावित भूतलीं लीला नाना ॥ १ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय स्थळ प्रत सं. क्र. काव्य ७८८ ता. २५।१०। ठाणे.
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे ४८८३
८०४२

## पद नं. ५

मारुं मी हांक कुणा । कोणी नसे त्राता
लागे हा फास गळीं । धांव हरी आतां ।।
जातां मज सोडुनी । बाळराज माझा ।।
घात मात्र होत असे । द्वेष भाव बीजा ।।
काळ व्यर्थ–लोटतसे । बंध मुक्त काजा ।।
मी दैवा कांकि देवा । लावूं हात माथा ।।

## पद नं. ६

देव अजी हा भेटला । जीव माझा डोलला
सुमंगला ही वेळा ।
स्वर्ग लाभला । जाणू या काला
नाचत आला । चवथीचा हा
चांद उदेला ।

अंतरीचा भाव खुलला
प्राण माझा हांसला ।।

## पद नं. ७

मुकली खचित विभवास भरतभू ।।
लागुनि फास गळां ।। धृ ।।
झाली माती मोत्यांची ही ।।
भाग्य रवी लोपला ।।
स्वशिरीं हाणी कर दशा अती दीन ।।
गाळीत अश्रु जला ।। १ ।।

पद नं. ८

दाटुनि येत गळा वदतांना
वाहिन व्यसनीं कोणी न करुणा ॥ धृ ॥
अन्न वस्त्र विण–हीन दीन–जना
धनिक गांजीती–दास्य पथ गणा ॥ १ ॥

पद नं. ९ भैरवी

प्रभुजि पदीं प्रार्थना
व्हावी पुरी वासना ॥ धृ ॥
जन्म हिंद देशीं धर्मीं ।
सदया सदा देई ।
नसे दुजी भावना ॥ १ ॥


पैशाचा योग्य मोबदला जर आपणांस पाहिजे तर–?

**व्ही. आर. सराफ ॲण्ड सन्स**

**सोनें चांदीचे व हिरे मोत्याच्या दागिन्यांचे व्यापारी**

जितेकराची चाळ, दत्तमंदिराजवळ, ठाकुरद्वाररोड मुं. २

येथें प्रथम चौकशी करा. आमचेकडे सर्वतऱ्हेचे सोन्या चांदीचे लेटेस्ट पॅटर्नचे दागदागिने फारच सुंदर व योग्य भावानें मिळतात. देवांच्या मूर्ति, भांडीं, मोती, जव्हेर खडयाच्या आंगठया, मेडल्स वगैरे सर्व प्रकारचा मनपसंत माल मिळेल.

खास उच्च वर्गाचे हिंदूकरितां स्वस्त व सोयीवार

मुंबईंत एकच ठिकाण.

टेलिफोन नं. ५२४८४. ] **माधवाश्रम** [ तारेचा पत्ता— माधवाश्रम बॉंबे

**भोजनाची व रहाण्याची उत्कृष्ट सोय.**

विद्युत् दीप व पंखे. उत्तम बगीच्या व स्वतंत्र शोभिवंत खोल्या.

**सरदार, जहागिरदार, श्रीमंत, सद्गृहस्थ, विद्यार्थी, व्यापारी वगैरे हिंदू प्रवासी यांस**

हवाशीर जागा, ट्रामच्या रस्त्यावर असून बॉम्बेसेंट्रल, बोरीबंदर, भायखळा स्टेशन आणि समुद्र यांचेपासून १० मिनिटांवर.

**कुटुंबासह राहण्याची स्वतंत्र व्यवस्था केली आहे.**

**माधवाश्रम बिल्डिंग, गिरगांव, मुंबई.**

एन्. डी. छत्रे यांचा कोल्हापुरी

स र्वो त्त म सं गी त

# चिवडा

रत्तल ] मंगलकार्यी वाटणेकरितां [ १४ आणे

के श री पे ढे मिळतात.

एन. व्ही. वेलणकर, कांदेवाडी, शाखा—गिरगांव मुंबई ४

# नंदादीप

(लेखक—पुष्पविहारी)

६६७२
७०५ ९८६

## प्रवेश पहिला.

[ पंढरपुरीं श्रीपांडुरंगाच्या मंदिरांत दर्शनासाठीं लोकांची ये जा चालू असतां मंदिरांसमोर सडकेवर श्वेतवर्ण येत असतां पडतो. त्याला सावरीत गोकर्ण ]

**गोकर्ण:**—पाहिलंस सहजीं पडे आणि दंडवत घडे, अशा मनांत गोष्टी नसतांनाहि घडून चुकतात किंवा चुकून घडतात. म्हणूनच सहजीं घडे तें सायासीं न घडे असें म्हणतात. काय समजलं-हं !

**श्वेतवर्ण:**—अडली गाय आणि फटके खाय, अशी गत झाली आहे माझी, तेव्हां बोलशील तें मुकाट्यानें सहन न करून कसें चालेल. पण कायरे, बेदर सोडून मला एथें आल्याला क्षयतिथी वजा धरली तरी शुद्धपक्ष संपून वर एक दिवस झाला पण......

**गोकर्ण:**—तुझ्या या धुतलेल्या निखाऱ्यासारख्या रूपानें नांवाशीं गट्टी फु केल्यामुळें विलंब लागतो. शिवाय आमावास्येशिवाय अन्य शुभयोग लाभत नसल्याचें नामांकित ज्योतिषांनीं वर्तवलेंच आहे. तेव्हां या वद्य-पक्षांत कुणाच्या तरी पदरीं पंतांच्या पाठिंब्यानें आश्रयाला लावतों. काय समजलं-हं !

**श्वेतवर्ण**०—म्हणजे आश्रयदात्याचें कांहीं अशुभ किंवा वाईट झाल्यास पांढऱ्या पायगुणाचें खापर खुशाल माझे माथीं आदळावें असेंचना. पण करता काय ! म्हणतात ना अडला हरी आणि पाय धरी.

**गोकर्ण०**—दोघेहि एकाच माळेचे मणी. बरं आतां पांडुरंगाच्या दर्शनाला तर चल. काय समजलं–हं !

**श्वेतवर्ण०**—एक सोडून हजार वेळ तुझ्या पायांवर डोकें फोडतों. पण पांडुरंगाच्या पायांवर नको. कारण आजवर नवससायास करतां फेडतां गांठीचें गमावलें, उपास तापास करून पोटाला आळविलें. सेवाचाकरी करून शरीर सुकविलें; पण उपयोग मात्र अं–हं !

**गोकर्ण०**—मला मात्र बसून ओसरीवरी देई माझा हरी, असें चाललें आहे. बरं तुझी मर्जी, पण मी दर्शन घेऊन येईपर्यंत जोडयांवर नजर ठेव. काय समजलं–हं !

**श्वेतवर्ण०**—त्याची नको तुला काळजी. मला जोडाची आणि जोडयांची जोडी जमविण्याची जोखीम घेणाऱ्या जोडीदारांच्या जोडयांवर नजर न ठेवून कसें चालेल. [ तेथेंच बसतो.

**गोकर्ण०**—( देवापुढें जाऊन ) पांडुरंगा, तुला साष्टांग नमस्कार घालतों. पण श्रमाचा भोपळा फोडू नको. नाहींतर तो श्वेतवर्ण, पराचा कावळा करील आणि मला घराबाहेर जावें लागेल.

[ दामाजीपत व मुजुमदार प्र क.

**दामाजीपंत०**—बापा पांडुरंगा, उगवता दिवस इतका खडतर येत आहे कीं, त्यापुढें मावळला दिवस शतपट बरा अशीच बोली बोलतांना, जो तो, जिकडे तिकडे आज दिसत आहे–कां न कळे पण बेदरच्या राजवटींत रयत रडतमुखानें दिवस कंठीत आहे. फार काय निसर्ग नियोजित कार्यें देखील अगदीं अनियमीत आणि अनिष्ठ घडून जनता, देव दयेच्या दानाला अंतरल्याची साक्ष अनुभवीत आहे.

**मुजुमदार०**—खरोखरीच भाकरीची भूक, चतकोरानें भागवली तरी कमाई पुढें खर्चाचा ‘ आ ’ उघडाच पडतो. पैदास निढळया घामाची

पण पिकांची प्राप्ती आंतबट्याची. कुठेही तेजी नाहीं. अशा वेळीं चुकून देखील शिवुं नये, अशी अशुभ शंका मनांत येतें कीं, न जाणो ईश्वरी कोप होऊन दुष्काळ पडला तर......

**दामाजीपंत०**—काय हाहाःकार उडेल! याची नुसती कल्पनाच अंगावर शहारे आणीत आहे. देव करो आणि असें अशुभ ग्रहण कधींहि न लागो.

**मुजुमदार०**—असे अनिष्ठ प्रसंग न यावे हें चांगलेंच पण आले तर त्याला आपण तरी काय करणार आणि हातून काय होणार.

**दामाजीपंत०**—असें म्हणून कसें चालेल. हरएक आपत्तींतून सुटकेचा सोईस्कर नसला, तरी अवघड मार्ग असतोच. मात्र तो शोधून त्यानें जाणें हें सूज्ञ मानवाचें कर्तव्य आहे.

**मुजुमदार०**—आपल्या बोलण्याचा आशय समजला. पण कनिष्ठानें वरिष्ठाशीं चर्चा करणें शिष्ठाचाराला सोडून आहे आणि लहान तोंडी मोठा घांस घेणें अयोग्यच आहे.

**दामाजीपंत०**—याबद्दल...पण यावेळीं राहूं दे तो विषय उद्यां सांगितल्याप्रमाणें कामाची व्यवस्था लावा.

**गोकर्ण०**—( पुढें येऊन ) सरकार, आपली कीर्ति ऐकून आश्रयाच्या आशेनें एक पांथस्थ बेदरहून आला आहे आणि तो आपली वाट बघत वाढेंतच बसला आहे.

**मुजुमदार०**—जग सुधारलें पण या गोकर्णांत काडी मात्र फरक झाला असेल तर शपथ.

**दामाजीपंत०**—त्याची तुला एवढी कींव आली. तर त्याला आधींच कां नाहीं पुढें आणलेंस. जा त्याला घेऊन ये.

**गोकर्ण०**—दोघेहि एकाच माळेचे मणी. बरं आतां पांडुरंगाच्या दर्शनाला तर चल. काय समजलं–हं !

**श्वेतवर्ण०**—एक सोडून हजार वेळ तुझ्या पायांवर डोकें फोडतों. पण पांडुरंगाच्या पायांवर नको. कारण आजवर नवससायास करतां फेडतां गांठीचें गमावलें, उपास तापास करून पोटाला आळविलें. सेवाचाकरी करून शरीर सुकविलें; पण उपयोग मात्र अं–हं !

**गोकर्ण०**—मला मात्र बसून ओसरीवरी देई माझा हरी, असें चाललें आहे. बरं तुझी मर्जी, पण मी दर्शन घेऊन येईपर्यंत जोडयांवर नजर ठेव. काय समजलं–हं !

**श्वेतवर्ण०**—त्याची नको तुला काळजी. मला जोडाची आणि जोडयांची जोडी जमविण्याची जोखीम घेणाऱ्या जोडीदारांच्या जोडयांवर नजर न ठेवून कसें चालेल. [ तेथेंच बसतो.

**गोकर्ण०**—( देवापुढें जाऊन ) पांडुरंगा, तुला साष्टांग नमस्कार घालतों. पण भ्रमाचा भोपळा फोडू नको. नाहींतर तो श्वेतवर्ण, पराचा कावळा करील आणि मला घराबाहेर जावें लागेल.

[ दामाजीपंत व मुजुमदार प्र क.

**दामाजीपंत०**—बापा पांडुरंगा, उगवता दिवस इतका खडतर येत आहे कीं, त्यापुढें मावळला दिवस शतपट बरा अशीच बोली बोलतांना, जो तो, जिकडे तिकडे आज दिसत आहे–कां न कळे पण बेदरच्या राजवटींत रयत रडतमुखानें दिवस कंठीत आहे. फार काय निसर्ग नियोजित कार्यें देखील अगदीं अनियमीत आणि अनिष्ठ घडून जनता, देव दयेच्या दानाला अंतरल्याची साक्ष अनुभवीत आहे.

**मुजुमदार०**—खरोखरीच भाकरीची भूक, चतकोरानें भागवली तरी कमाई पुढें खर्चाचा ' आ ' उघडाच पडतो. पैदास निढळया घामाची

पण पिकांची प्राप्ती आंतबटयाची. कुठेही तेजी नाहीं. अशा वेळीं चुकून देखील शिवुं नये, अशी अशुभ शंका मनांत येतें कीं, न जाणो ईश्वरी कोप होऊन दुष्काळ पडला तर......

**दामाजीपंत०**—काय हाहाःकार उडेल! याची नुसती कल्पनाच अंगावर शहारे आणीत आहे. देव करो आणि असें अशुभ ग्रहण कधींहि न लागो.

**मुजुमदार०**—असे अनिष्ठ प्रसंग न यावे हें चांगलेंच पण आले तर त्याला आपण तरी काय करणार आणि हातून काय होणार.

**दामाजीपंत०**—असें म्हणून कसें चालेल. हरएक आपत्तींतून सुटकेचा सोईस्कर नसला, तरी अवघड मार्ग असतोच. मात्र तो शोधून त्यानें जाणें हें सूज्ञ मानवाचें कर्तव्य आहे.

**मुजुमदार०**—आपल्या बोलण्याचा आशय समजला. पण कनिष्ठानें वरिष्ठाशीं चर्चा करणें शिष्ठाचाराला सोडून आहे आणि लहान तोंडी मोठा घांस घेणें अयोग्यच आहे.

**दामाजीपंत०**—याबद्दल...पण यावेळीं राहूं दे तो विषय उद्यां सांगितल्याप्रमाणें कामाची व्यवस्था लावा.

**गोकर्ण०**—( पुढें येऊन ) सरकार, आपली कीर्ति ऐकून आश्रयाच्या आशेनें एक पांथस्थ बेदरहून आला आहे आणि तो आपली वाट बघत वाटेंतच बसला आहे.

**मुजुमदार०**—जग सुधारलें पण या गोकर्णांत काडी मात्र फरक झाला असेल तर शपथ.

**दामाजीपंत०**—त्याची तुला एवढी कींव आली. तर त्याला आधींच कां नाहीं पुढें आणलेंस. जा त्याला घेऊन ये.

गोकर्ण०—एथूनच हांक मारतों. त्या पायऱ्यांशीं पारवे फुटल्यासारखा बसला आहे. श्वेतवर्णा, अरे ए श्वेतवर्णा.

श्वेतवर्ण०—( धां. ये. ) हे पुराण पुरुषा ( स्व. ) अरे पण यांतले दामाजीपंत पंडीत कोणते हा पांथस्थ आपणाला अभिनंदन ! छे ! सपशेल चुकलों ! अभिवादन करीत आहे आणि हे द्वितीय पुरुषा, माझें हे आपणांस नमन आहे.

मुजुमदार०—गुरुगृहीं ग्रहण केलेलें संस्कृत अगदीं मलीन झालें आहे. तरी शुद्ध बालबोध बोला.

गोकर्ण०—( स्व ) शहाणपणाचे दिवे पाजळून हा बेदरी बुद्रुक दोघांच्या अकलेचे दिवाळें वाजविलसें दिसतें काय समजलंस–हं !

दामाजीपंत० – बेदरहून मंगळवेढयाला मुद्दाम येण्यांत काय हेतू आहे.

श्वेतवर्ण० - आश्रयाशिवाय दुसरा कांहीं नाहीं. बेदाद बेदर बादशाहींत बांगडी बुरख्याशिवाय दाद लागण्याची वानवा.

दामाजीपंत०—मंगळवेढयांतच, पोटापाण्यापुरेशी मोल मजुरी मिळत नाहीं. म्हणून आश्रयासाठीं माणसें हपापलीं आहेत. त्यांची दाद लागण्यापूर्वी दूरच्या त्रयस्थाची दाद लावणें अन्यायाचें आहे. मुजुमदार, याची तूर्त सोय लावा.

मुजुमदार०—गोकर्णा, माझ्या घरीं त्याला घेऊन ये. पण आधीं सुलतानी सत्तेंत वाढवलेल्या याच्या या दाढीमिशांच्या कुरणाचा संन्यास घ्यावयाला लाव.

गोकर्ण०—ऐकलंस, नाहींतर तुझ्या घऱ्याची मुलं, भीति नको म्हणून या बागुल बुवाच्या दाढीमिशांचा यज्ञ करतील पण जोडे जपून ठेवले आहेस ना. काय समजलं–हं !

**श्वेतवर्ण॰**—डाव्या पायरीच्या उजव्या कोपऱ्याला कोपर खळींत गाडून ठेवले आहेत. [ दो. जा.

**मुजुमदार॰**—( स्व. ) पंतांच्या पापभीरूपणाचा फायदा घेऊन आपली पंढरी पिकवून न घेईल तो महामूर्ख. [ जातो.

**दामाजीपंत॰**—संध्यावंदनाची वेळ जवळ आली. तरी नित्याची प्रार्थना करून मुक्कामावर चलावं. विठूमाऊली, माझ्या हृदयांत आपला सदैव वास असावा. म्हणजे अधिकार मदाच्या धुंदीची बाधा न होतां सदा सदाचरणच माझे हातून घडेल.

पद

**हरि देई सदा हृदीं ठाव ।**
**राही मनीं मृदुभाव हा ॥ धृ ॥**
**घडो कदा नच मम या हातीं ।**
**पाप कृती खल गमवी भीती ।**
**घडो संतजन सेवा जीवा ।**
**हीन दीन जन जाहला ।** [ जातो

नोंद २१८८
८०७२

---

**प्रवेश दुसरा.**

[ सरकारी कचेरीशीं धान्य खरेदीसाठीं दलाल येतात. ]

**१ ला॰**—कसें काय मानकापे शेट, किती खंडीचा सौदा झाला.

**२ रा॰**—म्हणण्यासारखा अजून नाहीं.

**३ रा॰**—तें दिसतेंच आहे उतरलेल्या चेहऱ्यावरून.

**१ ला॰**—काय बात करतां खासगी खरेदी बेताबाताची असली तरी मंगळवेढयाच्या सरकारी धान्याचा धनी, यांच्याशिवाय दुसरा कोणी नाहीं.

**गोकर्ण०**—दोघेहि एकाच माळेचे मणी. बरं आतां पांडुरंगाच्या दर्शनाला तर चल. काय समजलं–हं !

**श्वेतवर्ण०**—एक सोडून हजार वेळ तुझ्या पायांवर डोकें फोडतों. पण पांडुरंगाच्या पायांवर नको. कारण आजवर नवससायास करतां फेडतां गांठीचें गमावलें, उपास तापास करून पोटाला आळविलें. सेवाचाकरी करून शरीर सुकविलें; पण उपयोग मात्र अं–हं !

**गोकर्ण०**—मला मात्र बसून ओसरीवरी देई माझा हरी, असें चाललें आहे. बरं तुझी मर्जी, पण मी दर्शन घेऊन येईपर्यंत जोड्यांवर नजर ठेव. काय समजलं–हं !

**श्वेतवर्ण०**—त्याची नको तुला काळजी. मला जोडाची आणि जोड्यांची जोडी जमविण्याची जोखीम घेणाऱ्या जोडीदारांच्या जोड्यांवर नजर न ठेवून कसें चालेल. [ तेथेंच बसतो.

**गोकर्ण०**—( देवापुढें जाऊन ) पांडुरंगा, तुला साष्टांग नमस्कार घालतों. पण श्रमाचा भोपळा फोडू नको. नाहींतर तो श्वेतवर्ण, पराचा कावळा करील आणि मला घराबाहेर जावें लागेल.

[ दामाजीपत व मुजुमदार प्र क.

**दामाजीपंत०**—बापा पांडुरंगा, उगवता दिवस इतका खडतर येत आहे कीं, त्यापुढें मावळला दिवस शतपट बरा अशीच बोली बोलतांना, जो तो, जिकडे तिकडे आज दिसत आहे–कां न कळे पण बेदरच्या राजवटींत रयत रडतमुखानें दिवस कंठीत आहे. फार काय निसर्ग नियोजित कार्यें देखील अगदीं अनियमीत आणि अनिष्ठ घडून जनता, देव दयेच्या दानाला अंतरल्याची साक्ष अनुभवीत आहे.

**मुजुमदार०**—खरोखरीच भाकरीची भूक, चतकोरानें भागवली तरी कमाई पुढें खर्चाचा ‘ आ ’ उघडाच पडतो. पैदास निढळया घामाची

पण पिकांची प्राप्ती आंतबट्याची. कुठेही तेजी नाहीं. अशा वेळीं चुकून देखील शिवुं नये, अशी अशुभ शंका मनांत येतें कीं, न जाणो ईश्वरी कोप होऊन दुष्काळ पडला तर......

**दामाजीपंत०**—काय हाहाःकार उडेल! याची नुसती कल्पनाच अंगावर शहारे आणीत आहे. देव करो आणि असें अशुभ ग्रहण कधींहि न लागो.

**मुजुमदार०**—असे अनिष्ठ प्रसंग न यावे हें चांगलेंच पण आले तर त्याला आपण तरी काय करणार आणि हातून काय होणार.

**दामाजीपंत०**—असें म्हणून कसें चालेल. हरएक आपत्तींतून सुटकेचा सोईस्कर नसला, तरी अवघड मार्ग असतोच. मात्र तो शोधून त्यानें जाणें हें सूज्ञ मानवाचें कर्तव्य आहे.

**मुजुमदार०**—आपल्या बोलण्याचा आशय समजला. पण कनिष्ठानें वरिष्ठाशीं चर्चा करणें शिष्ठाचाराला सोडून आहे आणि लहान तोंडी मोठा घांस घेणें अयोग्यच आहे.

**दामाजीपंत०**—याबद्दल...पण यावेळीं राहूं दे तो विषय उद्यां सांगितल्याप्रमाणें कामाची व्यवस्था लावा.

**गोकर्ण०**—( पुढें येऊन ) सरकार, आपली कीर्ति ऐकून आश्रयाच्या आशेनें एक पांथस्थ बेदरहून आला आहे आणि तो आपली वाट बघत वाटेंतच बसला आहे.

**मुजुमदार०**—जग सुधारलें पण या गोकर्णांत काडी मात्र फरक झाला असेल तर शपथ.

**दामाजीपंत०**—त्याची तुला एवढी कींव आली. तर त्याला आधींच कां नाहीं पुढें आणलेंस. जा त्याला घेऊन ये.

गोकर्ण०—एथूनच हांक मारतों. त्या पायऱ्यांशीं पारवे फुटल्यासारखा बसला आहे. श्वेतवर्णा, अरे ए श्वेतवर्णा.

श्वेतवर्ण०—( धां. ये. ) हे पुराण पुरुषा ( स्व. ) अरे पण यांतले दामाजीपंत पंडीत कोणते हा पांथस्थ आपणाला अभिनंदन ! छे ! सपशेल चुकलों ! अभिवादन करीत आहे आणि हे द्वितीय पुरुषा, माझें हे आपणांस नमन आहे.

मुजुमदार०—गुरुगृहीं ग्रहण केलेलें संस्कृत अगदीं मलीन झालें आहे. तरी शुद्ध बालबोध बोला.

गोकर्ण०—( स्व ) शहाणपणाचे दिवे पाजळून हा बेदरी बुद्रुक दोघांच्या अकलेचे दिवाळें वाजविलसें दिसतें काय समजलंस—हं !

दामाजीपंत०—बेदरहून मंगळवेढयाला मुद्दाम येण्यांत काय हेतू आहे.

श्वेतवर्ण० - आश्रयाशिवाय दुसरा कांहीं नाहीं. बेदाद बेदर बादशाहींत बांगडी बुरख्याशिवाय दाद लागण्याची वानवा.

दामाजीपंत०—मंगळवेढयांतच, पोटापाण्यापुरेशी मोल मजुरी मिळत नाहीं. म्हणून आश्रयासाठीं माणसें हपापलीं आहेत. त्यांची दाद लागण्यापूर्वी दूरच्या त्रयस्थाची दाद लावणें अन्यायाचें आहे. मुजुमदार, याची तूर्त सोय लावा.

मुजुमदार०—गोकर्णा, माझ्या घरीं त्याला घेऊन ये. पण आधीं सुलतानी सत्तेंत वाढवलेल्या याच्या या दाढीमिशांच्या कुरणाचा संन्यास घ्यावयाला लाव.

गोकर्ण०—ऐकलंस, नाहींतर तुझ्या धन्याची मुलं, भीति नको म्हणून या बागुल बुवाच्या दाढीमिशांचा यज्ञ करतील पण जोडे जपून ठेवले आहेस ना. काय समजलं—हं !

श्वेतवर्ण०—डाव्या पायरीच्या उजव्या कोपऱ्याला कोपर खळींत गाडून ठेवले आहेत. [ दो. जा.

मुजुमदार०—(स्व.) पंतांच्या पापभीरूपणाचा फायदा घेऊन आपली पंढरी पिकवून न घेईल तो महामूर्ख. [ जातो.

दामाजीपंत०—संध्यावंदनाची वेळ जवळ आली. तरी नित्याची प्रार्थना करून मुक्कामावर चलावं. विठूमाऊली, माझ्या हृदयांत आपला सदैव वास असावा. म्हणजे अधिकार मदाच्या धुंदीची बाधा न होतां सदा सदाचरणच माझे हातून घडेल.

पद

हरि देई सदा हृदीं ठाव ।
राही मनीं मृदुभाव हा ॥ धृ ॥
घडो कदा नच मम या हातीं ।
पाप कृती खल गमवी भीती ।
घडो संतजन सेवा जीवा ।
हीन दीन जन जाहला । [ जातो

क्र. २१८८
८०४२

---

प्रवेश दुसरा.

[ सरकारी कचेरीशीं धान्य खरेदीसाठीं दलाल येतात. ]

१ ला०—कसें काय मानकापे शेट, किती खंडीचा सौदा झाला.

२ रा०—म्हणण्यासारखा अजून नाहीं.

३ रा०—तें दिसतेंच आहे उतरलेल्या चेहऱ्यावरून.

१ ला०—काय बात करतां खासगी खरेदी बेताबाताची असली तरी मंगळवेढयाच्या सरकारी धान्याचा धनी, यांच्याशिवाय दुसरा कोणी नाहीं.

गोकर्ण०—एथूनच हांक मारतों. त्या पायऱ्यांशीं पारवे फुटल्यासारखा बसला आहे. श्वेतवर्णा, अरे ए श्वेतवर्णा!

श्वेतवर्ण०—( धां. ये. ) हे पुराण पुरुषा ( स्व. ) अरे पण यांतले दामाजीपंत पंडीत कोणते हा पांथस्थ आपणाला अभिनंदन ! छे ! सपशेल चुकलों ! अभिवादन करीत आहे आणि हे द्वितीय पुरुषा, माझें हे आपणांस नमन आहे.

मुजुमदार०—गुरुगृहीं ग्रहण केलेलें संस्कृत अगदीं मलीन झालें आहे. तरी शुद्ध बालबोध बोला.

गोकर्ण०—( स्व ) शहाणपणाचे दिवे पाजळून हा बेदरी बुद्रुक दोघांच्या अकलेचे दिवाळें वाजविलसें दिसतें काय समजलंस–हं !

दामाजीपंत० –बेदरहून मंगळवेढयाला मुद्दाम येण्यांत काय हेतू आहे.

श्वेतवर्ण० – आश्रयाशिवाय दुसरा कांहीं नाहीं. बेदाद बेदर बादशाहींत बांगडी बुरख्याशिवाय दाद लागण्याची वानवा.

दामाजीपंत०—मंगळवेढयांतच, पोटापाण्यापुरेशी मोल मजुरी मिळत नाहीं. म्हणून आश्रयासाठीं माणसें हपापलीं आहेत. त्यांची दाद लागण्या-पूर्वी दूरच्या त्रयस्थाची दाद लावणें अन्यायाचें आहे. मुजुमदार, याची तूर्त सोय लावा.

मुजुमदार०—गोकर्णा, माझ्या घरीं त्याला घेऊन ये. पण आधीं सुलतानी सत्तेंत वाढवलेल्या याच्या या दाढीमिशांच्या कुरणाचा संन्यास घ्यावयाला लाव.

गोकर्ण०—ऐकलंस, नाहींतर तुझ्या घन्याची मुलं, भीति नको म्हणून या बागुल बुवाच्या दाढीमिशांचा यज्ञ करतील पण जोडे जपून ठेवले आहेस ना. काय समजलं–हं !

**श्वेतवर्ण०**—डाव्या पायरीच्या उजव्या कोपऱ्याला कोपर खळींत गाडून ठेवले आहेत. [ दो. जा.

**मुजुमदार०**—( स्व. ) पंतांच्या पापभीरूपणाचा फायदा घेऊन आपली पंढरी पिकवून न घेईल तो महामूर्ख. [ जातो.

**दामाजीपंत०**—संध्यावंदनाची वेळ जवळ आली. तरी नित्याची प्रार्थना करून मुक्कामावर चलावं. विठूमाऊली, माझ्या हृदयांत आपला सदैव वास असावा. म्हणजे अधिकार मदाच्या धुंदीची बाधा न होतां सदा सदाचरणच माझे हातून घडेल.

**पद**

हरि देई सदा हृदीं ठाव ।
राही मनीं मृदुभाव हा ॥ धृ ॥
घडो कदा नच मम या हातीं ।
पाप कृती खल गमवी भीती ।
घडो संतजन सेवा जीवा ।
हीन दीन जन जाहला । [ जातो

[stamp] दाखल २९८८
८०४२

---

## प्रवेश दुसरा.

[ सरकारी कचेरीशीं धान्य खरेदीसाठीं दलाल येतात. ]

**१ ला०**—कसें काय मानकापे शेट, किती खंडीचा सौदा झाला.

**२ रा०**—म्हणण्यासारखा अजून नाहीं.

**३ रा०**—तें दिसतेंच आहे उतरलेल्या चेहऱ्यावरून.

**१ ला०**—काय बात करतां खासगी खरेदी बेताबाताची असली तरी मंगळवेढयाच्या सरकारी धान्याचा धनी, यांच्याशिवाय दुसरा कोणी नाहीं.

२ रा०—आपलीं पोटें ढेकर येईपर्यंत भरली कीं, दुसऱ्याची कुणीहि चेष्टा करावी.

३ रा०—पाहिलेंत चोराच्या उलट्या कश्या त्या. या मंगळवेढयांत मानकाप्यांची तुंबडी भरून उरेल त्यांत इतरांच्या तोंडाला पाने पुसली जातात.

१ ला०—पण अजून कचेरी कशी उघडत नाहीं.

३ रा०—दलालीचा मलीदा पदरांत घेऊन खासगी रीतीने बाजार तर झाला नाहींना.

२ रा०—म्हणजे आम्हां सावकारांची दिवाळी आणि होळी सारखीच होणार. [ मुजुमदार प्र. क.

मुजुमदार०—दरसाल उत्पन्नाची बाब घसरत आहे. पण सावकार दलालांची शिरगणती मात्र बढत आहे. [ अनुक्रमानें एकेक मुजुमदाराशीं कानकोष्टी करून सर्व जाग्यावर बसतात. ] सगळयांचे म्हणणें मी समजून घेतलें आहे, मी शक्य तो सर्वांची मागणी थोडयाफार प्रमाणांत पुरविण्याचा प्रयत्न करीन. ( स्व. ) ज्याच्याकडून माझा तळीराम गार होईल त्याची पाठ राखावयाची. तळें राखणारा पाणी न चाखील तर तो महामूर्ख हा स्वार्थाचा मूलमंत्र आहे.

दामाजीपंत०—[ प्र. क. सर्वांचे नमस्कार वगैरे होतात ] मुजुमदार, यांत मंगळवेढयांतलें सावकार किती आहेत.

मुजुमदार०—कोणी नाहीं. सर्व परपरगण्यातलेच आहेत.

४ था०—मी खुद्द पंढरपूचा असून वाजवी व्यवहारी म्हणून; सर्व बाजारपेठ ज्याला ओळखते तो मी, विठू शेटी.

मुजूमदार०—खुद्द व्यक्ति सर्वांच्या परिचयाची नसली, तरी नांवाची आख्याइका आहे. ( स्व. ) चोर तुपासह पोळी लांबवणार असें वाटतें.

**दामाजीपंत०**—चालू सालीं धान्याची विक्री फार कमी असून कांहीं काळ तरी परपरगण्यांतील सावकारांना तें न देण्याचें आम्हीं ठरवलं आहे, तेव्हां सर्वांनीं परत चलावं. विठूशेटी, सरकारी भाव कायम झाल्यावर आपणांस कळवूं मग आपण खरेदीस यावं.

[ सर्व दलाल सावकार जातात.

**मुजुमदार०**—[ स्व. ] भावाच्या देवघेवींत मानकाऱ्यापासून भरपूर फायदा घेऊन इतरांच्या तोंडाला पानें पुसण्याच्या माझ्या बेतानें अखेर माझ्याच तोंडाला पानें पुसलीं अं. [ उघड ] पंत, मला वाटतें या परतविलेल्या लोकांनीं, बेदरला तक्रार नेली; तर बादशहा आपणाला जाब विचारील.

**दामाजीपंत०**—परगण्याच्या अधिकाऱ्यावर, परगण्यांतील जनतेच्या रक्षणाचीच नव्हे; तर अन्य कितीतरी प्रकारची जबाबदारी असते; याची बादशहाला जाणीव आहे. जेव्हां लोकहिताच्या दृष्टीनें आम्ही केलेल्या योजनेचा जबाब ऐकून बादशहा रोष न करतां खूष होईल.

**मुजुमदार०**—चालू सालीं सारासुटीची मागणी फार आली आहे. आणि सर्वांच्या मागणीप्रमाणें सूट दिल्यास सरकारी खजिन्याला तूट भासणार आहे.

**दामाजीपंत०**—परिस्थिती जरी तशी खरी आहे, तरी कांहीं तहकुबी कांहीं सूट अशी देणें अगत्य आहे.

**मुजुमदार०**—पण त्याबद्दल बादाशाही शिक्यामोर्तबाचा, आपल्याला अद्याप खलिता आलेला नाहीं.

**दामाजीपंत०**—आपणाकडून तरी अजून सर्व परिस्थितीची माहिती, कुठे रावांना झाली आहे. आतां दोघानीं केलेली प्रत्यक्ष पहाणी; लोकांची

मागणी; आतांची सद्यस्थिती या सर्व गोष्टींचा आपल्या शिफारशीनें खलीता जाईल तेव्हां बादशाही फर्मान येईल.

**मुजुमदार०**—मग कशी काय माहिती पुरवावयाची.

**दामाजीपंत०**—एकच गोष्ट लक्षांत ठेवा; राजमान्यता मिळविणाराला लोकादरास सपशेल मुकावें लागतें. लोकप्रियताच संपादन करावयाची असेल तर राजरोषास सादर व्हावें लागतें. आणि दोन्ही कमवावचीं असतील तर निस्वार्थीपणा; सचोटी; करारीपणा; दयाळूस्वभाव; या सर्वांची एकी करून खऱ्या वस्तुस्थितीची राजकर्त्यांना जाणीव देऊन, राजा व जनता या दोघांच्या संमतीनें व सलोख्यानें व्यवहाराची घडी बसवावी लागते.

**मुजुमदार०**—आम्हीं हूकमाचें बंदे. वरिष्ठांच्या सांगीप्रमाणें पांढऱ्यावर काळें करणें हें आमचें काम.

**दामाजीपंत०**—हीच कल्पना चुकीची आहे. देवडीवरच्या रखवालदारापासून तहत राजासह सर्व रयतेचे नोकर आहेत. मात्र कामाच्या मगदुराप्रमाणें माणसावर जबाबदारी असतें. वरिष्ठ कनिष्ठ, ही त्या कामाच्या जागेपुरती व वेळेपुरती बाब आहे. पण सर्वांनीं एकमेकांच्या विचारानेंच वागणें हितकर आहे. असो. मगाचच्या बोलण्याप्रमाणें बेदरला खलिता रवाना करा. मी तक्रारी वगैरे बाबींचा निकाल लावतों [ जातो.

**मुजुमदार०**—श्रीमंती आणि सत्ता, यांच्यासाठीं तळमळणाऱ्या माझ्या आत्म्याला शांतीचा उदयकाल किती दूर आहे कोणास ठाऊक. कोण आहेरे तिकडे. [ श्वे. व गो. प्र. क.

**श्वेतवर्ण०**—सेवेला सादर आहें सरकार.

**गोकर्ण०**—आणि आपल्या धाकाचा आहेच तसा दरकार काय समजलं–हं !

**मुजुमदार०**—उद्यां दोघांनीं बेदरला जावयाचें आहे. मात्र तेथें पाहुणचार घेण्यांत दंग न होतां लवकरच परत आलें पाहिजे. [ जातो.

**गोकर्ण०**—ए बेदरी बेडका, कशी आहे मंगळवेढयांत मौज. लावला की नाहीं आश्रयाला. याला म्हणतात–हें ! काय समजलं–हं. !

**श्वेतवर्ण०**—देवानें तुला कसा घडविला. तें एक देवच जाणें, मात्र तुझ्यासारखा तूच म्हणून म्हणतो......

**गोकर्ण०**—अरे शहाण्या, म्हणतों नव्हें म्हटलें. अहेंच तसा मी, काय समजलं–हं ! [ दोघेही जातात.

---

## प्रवेश तिसरा.

**मिठू०**—दुनिया क्या है !

**कादर०**—दिवानों कां बझार है झुकती है. लेकिन झुकानेवाला चाहिये मालुम.

**मिठू०**—दोस्त इसके वास्ते. दरिद्री चले दर्यापूर तो करम चले साथ। मोतीके वास्ते डुबगया तो शंख लगे हाथ ॥फिर क्या जानादो ओत्रि दिन जायगा.

**कादर०**—मेरा दोस्त, जरा गांजेका कली तो मल्. नहीं तो भांग का लोटा झोक.

आखेंलाल दिलसाफ. मिठूभाई, या दख्खनची मराठी बोली मला फार प्यारी वाटते.

**बादशहा०**—[ प्र. क. ] मिठू, कादर, भांग गांजाची निशा करून पहारा करतां काय.

मिठू०--[ स्वगत ] वखत गुदरे बांका तो गद्धे कू बोलने काका! आतां या कादरचा! कासोटा न धरीन; तर हा आग्यावेताळ माझ्या अंगाची चामडीच लोळवील. [ उघड ] कादरभाई, खाने कु हम और लढने कू तुम. बडेभाई तेव्हां बादशहाची मर्जी सांभाळा.

बादशहा०—ए पागल बोलत कां नाहीं. शुद्धीवर आहेस कीं कोरडे उडवून निशा उतरूं.

कादर०—जी–हां–हुजूर. धनीसाहेब; आमची कसूर नाहीं. आम्हांला गाफील करून दरवडा घालण्याचा चोरांचा बेत होता. पण आमची धमकी पहातांच चोरांनी सू–केली त्यांची ही तयारी एथें पडली आहे.

मिठू०—आम्ही दोघे, ते सहाजण, पण का जेव्हां म्यानातून बाहेर काढली.

कादर०—तेव्हांच त्यांची लुंगी झाली ओली. मिठू असेच ना?

बादशहा०—चला चालते व्हा देवडीवर बेवकूप.

मिठू—हुजूर–जी–हां [ जातात

बादशहा०—मंगळवेढयाकडून सरकार धान्याची भरपाई बेदरला अजून कां झाली नाहीं कांहीं समजत नाहीं. कारभारी तर करडया शिस्तीचे त्यांच्याबद्दल संशय घ्यायला जागा नाहीं. मग असें कां झालें.

मिठू०—( प्र. क. ) हुजुर; कोणी जासूद आले आहेत.

बादशहा०—जा त्यांना आंत घेऊन ये.

मिठू०—हुजुर जी–हां [ जातो

कादर०—( प्र. क. ) हुजुर, ते आपली भेट मागत आहेत.

बादशहा०-- मिठूला सांग त्यांना जलदी आंत आण.

कादर०--जी–हां हुजूर. [ जातो.

[ गोकर्ण व श्वेतवर्ण प्र. करतात. ]

८८४२

गोकर्ण०--मंगळवेढयाच्या कारभाऱ्याकडून हा खलिता आणिला आहे. [ देतो

श्वेतवर्ण०— बांदशाही फर्मान लवकर यावें अशी मागणी आहे.

बादशहा०—" पिकाचें उत्पन्न फार कमी आहे. व्यवहाराला तेजी नाहीं. ठरविक सरकारी कर भरण्याची लोकांत कुवत नाहीं. लोकांची गाऱ्हाणीं फार येत आहेत, म्हणून सर्व परगण्याची पहाणी करतां असें आढळून येते कीं, कांहीं सूट, कांहीं तहकुबी दिल्यानें रयत व राजकर्ते यांच्यामध्यें पेच प्रसंग न येतां कारभार सुरळीत चालेल असा आमचा अभिप्राय आहे तरी बादशाहनें विचार करून कायतें फर्मान याच जासुदांबरोबर धाडावे अशी विनंती आहे." ठीक आहे. कोण आहे तिकडे.

मिठू०—हुजूर, काय हुकूम आहे.

बादशहा०—कारभाऱ्यांना सांग, मंगळवेढयाच्या जासुदांना या खलीत्याचा बादशाही शिक्या मोर्तबाचा ताबडतोब असा जबाब द्या कीं "सरकारी खजीन्याला तुटीची तात लागणार नाहीं. अशारीतीनें योग्य वाटेल तसें करण्याची आपणांस परवानगी आहे."

मिठू०—हुजुर-जी-हां [ जातो

बादशहा—कादर हिंदू माणसांकडून यांच्या खाण्यापिण्याची चांगली व्यवस्था कर. जासूद, आमचे कारभारी खलिता देतील तो घेऊन जा [जातो

कादर०—जी-हां-हुजुर.

गोकर्ण०—मिया मूठभर पण दाढी हातभर काय समजलं-हं !

श्वेतवर्ण०—बादशाहींत बडी मेजवानी तर खा आधीं कादर, चल. मिया बोले आणि दाढी हाले.

कादर०—राजा बोले दळ हाले. [ जातात

११८६

### पद

आली हसत छान मधुमय प्रभात
गाऊं आनंद गान मधु मृदु अपार
मन रमवूं फार
क्षण विसरूं ताप
क्षीण फार नोकरी माजी ॥ धृ ॥
या लुटु आजी सुखानंदा
वा नाहीं खास कुणी बंदा
या मारु मौज करूं छंदा
जीव छान रीझवि आजी ॥ धृ ॥

---

## प्रवेश चवथा

मुजु०—कारकुनाच्या कसलेल्या कलमाची कसबी कारवाई, काळ्या कुट्ट करामतीची न निपजली तर तो कारकुन कसला. पण धीर सो गंभीर. नाहींतर दुसऱ्यासाठीं उकरलेल्या खड्यांत आपल्याला आपणच गाडून घ्यावें लागेल. [ जमाबंदीच्या वह्या तपाशीत बसतो.

गंग्यामहार—( प्र. क. ) कोण आहे कचेरीत, मायबाप सरकारच्या मदतीची मागणी मागण्यासाठीं रयत दाराशीं आलीं आहे.

मुजुम०—छे ! कामाकडे लक्षच लागत नाहीं. रात्रीच्या स्वप्नांतच मन घोटाळत आहे. महामारी जोरांत आहे. माणसें माणसानां खातात असा दुष्काळ पडला आहे. माझी राक्षसी महत्वाकांक्षा सफल होण्याच्या बेतांत आहे. पहाटेचीं स्वप्नें खरीं ठरतात. असें म्हणतात तसें जर खरें झालें तर–

**गंग्या०** — काय ? कोणीच कसें हांक देत नाहीं ? कोण आहे कचेरींत राजाची मदत मागायला रयत दारीं आली आहे.

**मुजु०**—येन केन प्रकारेण प्रसिद्ध पुरुषो भवेत एवढं आपल्याला ठाऊक. मग लोक कांहीं म्हणोत.

**गंग्या०**—दिवसा ढवळ्या मंगळवेढयाच्या सरकारी दाराशीं टाहो फोडून रयत मदत मागत असतां दाद लागत नाहीं.

**दामाजी०**—(प्र. क. ) दाद लागत नाहीं कोण म्हणतो दाद लागत नाहीं म्हणून ! जोवर दामाजीपंताच्या कुडींत प्राण आहे तोंवर रयतेच्या आरोळीचा आवाज थांबण्यापूर्वी तेथें सरकारी सहाय्य धावून जाईल. कोण आपण. किती वेळ झाला काय काम आहे.

**गंग्या०**—माझे नांव गंग्या महार, घटकाभर दाराशीं हांकारे देत आहे. गांवच्या वेशीवर सावकारानें मुंडी मुरगळून कुळाचा जीव घेतला. त्याची बायको आणि लहान दोन मुल धाय मोकलून रडत आहेत. त्यांची दाद घ्या.

**दामाजी०**—कोण मुतुमदार, दाराशीं दयेसाठीं लोक टाहो फोडीत आहेत. पण तुमच्या कानावर त्याचा वाराही नाहीं. आजब आहे.

**मुजु०**—कामाच्या घाईत तसें झालें चुकून खरें.

**दामा०**—आतांच्या आतां याचे बरोबर जा. सावकाराला कैद करा. बायको मुलांची सरकारी खर्चानें नीट सोय लावा. गंग्या यांचे बरोबर जा. पण परत ये—हं. ( दोघे जातात ) अरेरे काय ही माणुसकी ! देवा पांडुरंगा, गरीबी आणि श्रीमंती जगांत कशाला पैदा केलीस.

[ गो. श्वे. प्र. करितात.

**श्वेतवर्ण**—बादशाही शिक्यामोर्तबाचा हा खलिता आणला आहे.

**गोकर्ण**—आपला खलिता वाचतांच कांहीं विचार न करतां वेळ न

गमावतां तावडतोब उत्तरासह आमची रवानगी झाली. ( स्व ) बाकी मी आहेंच तसा शुभ लक्षणी काय समजलं–हं !

श्वेत०—तें काय मीच थोडें सांगायला पाहिजे.

दामा०—जा दोघानीं थोडावेळ विश्रांती घ्या. आनंद आहे ! आमच्या मनाप्रमाणें बादशाही फर्मान हातीं येऊन जनताजनार्दन, संतुष्ट राखण्याची सुसंधी खरोखरोच पांडुरंगानें दिली. विठू माऊली; असें फर्मान हातीं आलें नसतें तर तळमळणाऱ्या लोकांचे शिव्याशाप माझे माथी येते. बापा, पांडुरंगा.

सुजु०—( प्र. क. ) आपल्या आज्ञेप्रमाणें सावकाराला गिरफदार करून आणलें आहे; आणि चावडींत खोडयांत अडकविलें आहे. बायको मुलें, त्यांच्या नातलगाकडे पावती केलीं. त्यांच्या पोटापाण्यासाठीं या गंग्या-महारानें आपकमाई सरकारपाशीं देण्याचा अर्ज केला आहे. तसेंच चौकशी अंतीं सावकारी संपत्ती सरकार जमा व्हावी. कारण ती सर्व अन्यायानें कमविल्याचें सिद्ध झालें आहे. शिवाय सावकार एकटाच असून त्यावर कुणी अवलंबून नाहीं.

दामा०—फारच चोख कामगिरी बजावलीत. अशीच कामें, जर सर्व लोक करूं लागतील तर किती चांगलें काम होईल.

गंग्या०—दामाजीपंत, मला क्षमा करा. मघाशीं टाकून बोललों तें मनावर घेऊं नका आपला कारभार पाहून, लोकांकडून कीर्ति ऐकून मी या क्षणापासून आपल्या पायाचा चाकर झालों आहे.

दामा०—गंग्या मीच दुसऱ्याचा चाकर आहे. तुझ्यानें झाली तर माणसाची नको पण देवाची चाकरी कर. त्यांतच जन्माचें सार्थक आहे.

गंग्या०—पण मी जातीचा घेड, माझ्या सावलीचा लोकांना विटाळ

होऊन आंघोळ करावी लागते. माणसा माणसांतच असा फरक मग देवाच्या दाराशीं तरी आमची गत काय.

**दामा०**—तुझें म्हणणें माणुसकीच्या दृष्टिनें खरं धंरलं, तरी देवाच्या दृष्टिनें सर्व मानवजात त्याला सारखींच. त्याच्या घरीं भेद फक्त पापी आणि पुण्यवंत एवढाच. असो. तू घरींच बसून खऱ्याखुऱ्या भक्ती भावानें पांडुरंग ! पांडुरंग म्हटलेंस तरी देव दूर नाहीं याची तुला साक्ष पटेल.

**गंग्या०**—या गरीबाला, पायांच्या पाईकाला विसरूं नका. येतो बरं—जोहार. [ जातो.

**मुजु०**—चांगल झाल. लोकांचं गाऱ्हाण दूर झालं आपल्यावरचा अपेश टळेल.

**दामा०**—चला बराच वेळ झाला. कचेरीचं कामहि संपलं.

---

## प्रवेश पांचवा

[ दामाजीपंत ओटीवर गीता वाचीत अहेत. व्हरांड्या बाहेर ]

**श्वेत०**—वाडवडील सांगत आलें कीं, उत्तम शेती, मध्यम धंदा, जी धंदा लाचारी ! तें कांहीं खोटें नाहीं. भुकेसाठीं भाकरी, आणि भाकरीसाठीं चाकरी करतां करतां मान कशी मुरगुळून निघते, याची कल्पना नोकर-पेशा पत्करल्याशिवाय कुणाच्याहि देवालाहि यावयाची नाहीं. पण करतां काय म्हणतात ना पोटाला बसला चिमटा आणि झाड लोकांचा उंबरटा. गुतूं नये आणि कुथू नये म्हणतात तें यालाच बरं. थकल्या भागल्या देहाला द्यावा जरा हरी चरणीं ठेवून आणि काय. [ जांभाई घेत नि. त.

**गोकर्ण**—( प्र. क. ) चंबूगबाळें गुंडाळून हा बेदरचा बुभुक्षित एथें आला खरा, पण आंधळं दळतं आणि कुत्रं पीठ खातं असा मांझा मात्र

प्रकार झाला. सारी गरजे पुरती दुनिया, दुसरें काय म्हणतात ना तोब-ऱ्याला तोंड पुढें आणि लगामाला मागें तें ह्यालाच काय समजलं–हं !

दामा०—आकाशात पतितं तोयं । यथा गच्छति सागरम् । सर्व देव नमस्कारं । केशवं प्रति गच्छति ॥ कोण आहेरे बाहेर. ( गो. व श्वे. पुढें येतात ) एकानं मुजुमदारांना सांगा कीं, काम आटोपल्यावर मी घरींच बोलविलें आहे. आणि दुसऱ्यानें कचेरीकडे फेरी मारायला जा.

गोकर्ण०—त्या आग्यावेताळा पुढें जावयाचें म्हणजे माझ्या नाड्याच गार पडतात. तेव्हां यालाच द्यावा पाठवून झालं. श्वेतवर्ण, तू जा मुजुमदारांकडे बुडाला तर बेडूक, उडाला तर कावळा, आपल्याला सोहेर सुतक थोडेंच आहे. काय समजलं–हं [ जातो.

श्वेतवर्ण—नोकरी म्हणजे सुळावरची पोळी. पण पोट पाठीस लागलं कीं पडेल तें केलं पाहिजे. म्हणतात ना कुठेहि गेलं तरी पळसाला पान तीनच. [ जातो.

दामा०—गतसालची घडी कशी बशी बसतें न बसतें तोंच हें खडतर गंडांतर कोसळलं ना.

मुजुमदार०—( प्र. क. ) स्वार्थी व पापी नजर अधोमुख असते. पुण्यवंत व सदाचारी सत्पुरुषांच्या पुढें येण्यास तिला थरकांप सुटत असतो.

दामाजीपंत०—पाहिलंत मुजुमदार, बोलाफुलाला कशी गांठ पडते ती. कोणी ईश्वरी कोप म्हणतो किंवा दुसरे दुसऱ्या नांवानें म्हणोत. पण चालू सालीं दुष्काळ पडला. जनतेवर मोठा अनर्थ ओढवला.

मुजुमदार०—त्याला आपण काय करणार. ईश्वरी सत्तेपुढें कोणाचा इलाज चालणार. पण तातडीनें मला कशासाठीं बोलाविलं आहे.

दामाजी०—मंगळवेढयाच्या हद्दींत येणाऱ्या सर्व मुलखांत फिरून रयतेची स्थिति कशी आहे त्याची पाहाणी करून खऱ्याखुऱ्या गोष्टींचा

अहवाल तपशीलवार मिळवून आणण्याची नाजूक पण जोखमीची कामगिरी, मी आपणांवर सोंपवीत आहें. आपण सरकारी अधिकारी, तेव्हां आपल्यावर किती जबाबदारी आहे याची कल्पना असेलच.

**मुजुमदार०**—पंत, मला वाटतं अशी माहिती मिळवून रयतेच्या मदतीची मागणी भागवितां येणार नाहीं. आणि रक्षणाचा रस्ताहि नक्की ठरवितां येणार नाहीं.

**दामाजी०**—भावी संकटाला तोंड देण्यासाठींच मागल्या पुढल्या परिस्थितीचा दूर दृष्टीनें विचार करून धान्याची सरकारी पेवें, जास्त वाढविलीं तीं यासाठींच.

**मुजुमदार०**—आपल्या राजकारण पटुत्वाचें महत्त्व मला आज उमजलें. पण पंत, नुसत्या धान्याच्या पेवांनीं रयतेचें पुरें रक्षण होईल असें निदान मला तरी वाटत नाहीं.

**दामाजी०**—आपलें म्हणणें खरें आहे. त्यासाठीं दुसऱ्या पुष्कळ गोष्टींची जरुरी आहे. आणि त्यासाठींच आपल्यावर बजावलेली कामगिरी किती महत्त्वाची आहे हें ध्यानांत येईल.

**गंग्यामहार०**—जोहार मायबाप-सरकार ! दया करा ! देवाचा कोप झाला. पावसानें पाठ दाखविली. पोटासाठीं लोकं धाय मोकलू लागलीं, पोटभर नको, पण भुकेच्या वेळीं चतकोर भाकरीची भीक घालून दिनांचा दुवा घ्या !

**दामाजी०**—मुजुमदार, हृदय पिळवटून निघणारे हे शब्द ऐका. आणि विलंब न लावतां सांगितलेल्या कामाला सुरवात करा.

**मुजुमदार०**—( स्व. ) ज्याच्या हातीं ससा तो पारधी. कशी सोन्यासारखी संधी लाभली आहे. आतां मन मानेल तशा करण्या करून आसुरी लालसा भागवीन तरच नांवाचा मुजुमदार, काळें वीष ओकणाऱ्या कलमाचा बहादूर. [ जातो.

दामाजी०—गंग्या जा देवाला विसरूं नकोस. हा दामाजी रयतेच्या पोटाची चिंता दूर झाल्याशिवाय सुखाचा घास किंवा झोप घेणार नाहीं.

गंग्या०—जोहार. देवा पांडुरंगा पोशिंद्याची पाठ राख. [ जातो.

[ ४ ५ दुष्काळ ग्रस्त ]

१ ला०—सरकार आम्हीं उपाशी मरूं पण कच्च्याबच्च्यांच्या किंकाळ्या ऐकवत नाहींत !

२ रा०—पोशिंद्यांनीं उपाशी पोटीं जनतेला तळमळून तशीच मरूं द्यावी का.

३ रा०—आमच्या किंकाळ्या बादशहाच्या कानावर घालून किंव करायला सांगा. पाठीवर कोरडे उडवा पण पोटाला मारूं नका.

दामाजी०—माझ्या बंधूनों, तुमची करुण कहाणी पथ्थराला पाझर फोडील मग मानवाची काय कथा ! धीर सोडू नका देवाची करुणा भाका ! दिनांचा दयाळू देव, बादशहाला बुद्धि देऊन तुमची हांक ऐकेल बरं ! जा. [ जातात.

## पद

कोठें गुंतलासी देवा । जागवी ब्रीदाला ॥ धृ ॥
घाय मोकलीती लोक । मारिताती करुणा हांक
धांव शीघ्र भुवनीं आतां । आळवूं दयाळा ॥ १ ॥

---

## प्रवेश सहावा

( कचेरी )

मुजुमदार०—राजीखुषीनें आणि अक्कलहुष्ारीनें या टाकलेल्या गळाला मासा अडकलाच पाहिजे. मात्र सहीसलामत त्यांतून कसें तरायचें हें डोळ्यांत तेल घालून पहात राहिलें पाहिजे.

**श्वेतवर्ण०**—धन्याच्या सांगिबरहुकूम कामाची नीटनेटकी व्यवस्था लावली.

**गोकर्ण०**—बिनबोभाट केलेल्या कामाची अखेर बोंबाबोंब होण्यासारखा एकहि अनिष्ट ग्रह आपल्या राशीला प्रतिकूल नाहीं—मात्र आपण मनांत आणल्यास दुसऱ्यांना अगदीं अनिष्ट असे प्रतिग्रह बनू शकाल, असें जालंदर ज्योतिषांनीं बोटें मोडमोडून आपणांस सांगावयास सांगितलें आहे. काय समजलं—हं !

**श्वेतवर्ण०**—अगदीं सांबापुढचा किंवा अडणीवरचा आहेस ! कानमंत्र म्हणून सांगितलेला निरोप असा मोठ्यानें का सांगतात.

**मुजुमदार०**—चला चालते व्हा. निरोप सांगण्याचीहि अक्कल अंगीं नाहीं. नुसते भोजनभाऊ जन्माला आलांत.

**श्वेतवर्ण०**—ऐकलंस. वाढ ताडाची पण अक्कल शेळीच्या गळ्यांतल्याची.

**गोकर्ण०**—सत्तेपुढें शहाणपणा चालत नाहीं म्हणतात तें यालाच—काय समजलं—हं ! [ दो. जा.

**मुजुमदार०**—हुजुरांना सादर करण्यासाठीं हा खलिता कसा बेमालूम तयार केला आहे.

**दामाजीपंत**—मुजुमदार कशी काय कामाची वासलात लावलीत. आपल्यावर जनतेचा काडीमात्र दोषारोप येणार नाहीं. तसेंच देवादारींही आपण यत्किंचित गुन्हेगार ठरणार नाहीं. अशी भीति बाळगून खलिता तयार केला आहाना.

**मुजुमदार०**—याबद्दल आपण काडीमात्र शंका घेण्याचें अगर भय बाळगण्याचें कारण नाहीं.

**दामाजीपंत०**—मग आतांच्या आतां श्वेतवर्णा हातीं, बेदरला हा खलिता रवाना करा. कारण वेळच्यावेळीं झालेल्या गोष्टी हितकर होत असतात. कोण आहेरे तिकडे. [ श्वे. प्र. ] आतांच्या आतां बेदरला जा आणि हा खलिता बादशहाकडे सुपूर्त कर.

**श्वेतवर्ण०**—जशी आज्ञा ( स्व ) हा मुजुमदार म्हणजे धूमकेतू किंवा शेंडे नक्षत्रासारखा हात धुवून पाठीस लागला आहे नुसता. पण याद राख आज लोकांना रडयतां रडवतां उद्यां तू मात्र डोळे पुसायला लागू नको म्हणजे झालें. [ जातो.

**१ ला. दु०**—मंगळवेढयांत दुष्काळाचा वणवा पेटला ! पोटासाठीं लोक धाय मोकलू लागले !

**२ रा. दु०**—देवाचा कोप झाला ! मंगळवेढयावर मोठा कहर गुदरला. पोटासाठीं तडफडून प्राण सोडल्याची पाळी आली !

**३ रा. दु०**—राजाला तरी रयतेची दया येवो ! आणि घासभर अन्न तरी लोकांच्या तोंडी पडो !

**४ था. दु०**—मंगळवेढयाचे सर्वाधिकारी, लोकांचा टाहो ऐका. आपणावर रयतेच्या रक्षणाचा बोजा आहे याची आठवण करा. लोकांची करुण किंकाळी कानाआड घालू नका.

**मुजुमदार०**—आम्हीं ऐकत आहोंत. गडबड बंद करा. तुमच्या भुकेचीच काळजी वाहण्यांत आम्हीं गुंग झालों आहों समजलांत. आरडाओरड करून कामें होत नसतात. चला घरोघर जा.

**दामाजी०**—मुजुमदार, परदुःख शीतल असतं. पोटाला चिमटा बसल्याशिवाय त्याची कल्पना येणार नाहीं तुम्हांला. त्या दीनदुबळयांवर रागाची आग पाखडण्यापेक्षां मायेच्या बोलण्याचें तरी पुण्य पदरीं घ्या. बंधूनो,

तुम्हांला उपाशीं पोटीं मारून तुमच्या तळमळणाऱ्या आत्म्यांचे शाप माथीं घेऊन मी देवादारचा बंदीवान होणार नाहीं.

**मुजु०**—ऐकलेंत ना पंतांचें बोलणें. आतां घरीं जा काळजी करूं नका. [ लोक जातात.

**दामा०**—पांडुरंगा, तुझ्या दयेचा सागर आटला का ! करुण किंकाळ्या नाहीं का तुझ्या कानीं येऊन करुणा येत तुला ! विठू माऊली सांग मी काय करूं तें ! [ हात जोडून मनांत प्रार्थना करितो.

**मुजु०**—( स्व. ) केलेल्या भाकिताप्रमाणें अखेर हा पापभिरु धर्मात्मा खात्रीन वागणार. आणि माझी मनीषा सफल करणारा उषःकाल लवकरच उगवणार यांत संशय नाहीं.

**दामा०**—हो ! असंच ! मग त्याबद्दल मलाच काय शासन व्हावयचें असेल तें होवो. मानवी न्यायासनासमोर जरी मी दोषी ठरलों तरी परमेश्वराच्या परमोच्च सिंहासनासमोर मी निर्दोषीच ठरेन. मजुमदार सरकारी धान्याची कोठारें खुलीं करून लोकांना धान्य वाटण्याच्या कामगिरीस सुरवात करा.

**मुजु०**—पण पंत, बादशाही परवाना आणल्यावांचून परभारें अशी गोष्ट केल्यास तो बादशहा आपणांस शासन करण्यास कमी करणार नाहीं.

**दामा०**—त्याची काळजी मला आहे. आज मंगळवेढयाचा सर्वाधिकारी मी आहें. खऱ्या स्थितीचें ज्ञान मला आहे. राजानें स्वतः अर्धपोट रहावें पण रयतेला पोटभर जेऊं घालावें. रयतेला भुके मारून राजानें आनंदांत राहाणें योग्य नाहीं. चला माझ्या बरोबर मंगळवेढयांतील लोकांना सरकारी धान्याची वाटणी करायला. [ जातो.

**मुजु०**—ठीक आहे. तापल्या तव्यावर पोळी भाजून न घेईल तो महामूर्ख. पहिला खलिता फोडून बादशहाची नजर त्यावर गेली नाहीं तोंच

' मंगळवेढयाचे सर्वाधिकारी, बादशहाशीं बेमान झाले, सरकारी धान्याची, मन मानेल तशी वासलात लावून सरकारी खजिना ओस पाडण्याची पाळी आली. आम्हीं कनिष्ठांनीं वरिष्ठांविषयीं असें परभारें कळविणें जरी अन्यायाचे असलें. तरी बादशहाचे विश्वासू नोकर व राजनिष्ठ रयत, या नात्यानें हुजुरांस खरी हकीकत कळवीत आहें. " असा मजकूर बादशहाचे नजरे समोर आला कीं दुसरें काय पाहिजे. आतां बेदरला हा खलिता रवाना करतों. ( खलिता लिहून ) कोण आहेरे बाहेर.

**गोकर्ण**—आज्ञाधारक हजर आहे. ( स्व. ) थुंकी न झेलील तो नोकर कसला. काय समजलं-हं !

**मुजु०**—पळाचा विलंब न लावतां बेदरला जा. आणि खुद्द बादशहाचे हातीं हा खलिता दे. कामांत कुचराई झाली तर जिवाला मुकशील. माझ्याशीं गांठ आहे हें लक्षांत ठेव. चल पाय उचल.

**गोकर्ण**—( स्व. ) हातीं कोलीत मिळाल्यावर आग न लावील तर तें पिशाच्य कसलें. काय समजलं-हं !

---

## प्रवेश सातवा

( बेदरच्या दरबारीं )

**मिठू०**—शहाण्याचा व्हावें चाकर पण मूर्खाचा होऊं नये धनी ही म्हण कांहीं खोटी नाहीं. या कादरच्या कानींकपाळीं ओरडतां जीव जाण्याची पाळी आली पण त्याचा परिणाम काय तर पालथ्या घडयावर पाणी.

**कादर०**—बडेभाई, पहा कशी कळी मळली आहे ती. तब्येत खूष व्हायला हीच एक दवाई जगांत पैदा झाली आहे.

**मिठू०**—परवांच्या दिवसाचे कोरडयाचे वळ, अजून ओले आहेत. तोंच परत निशाबाजी करायची तयारी.

**बादशहा**---काय चाललें आहे. देवडीवर कुणाचा पहारा आहे.

**मिठू०**---जी-हां-हुजूर, देवडीवरचा पाहारेकरी पहाटेस पागलखान्यांत पडला

**कादर०**---हां-जी-हुजूर, तेथें माझी नेमणूक व्हावी असा अर्ज आहे.

**बाद०**---मग राजवाडयाला निशाबाजांची धर्मशाळा व्हायला काय उशीर! बाहेर कोण हाक मारतो आहे पहा.

**मिठू०**---( श्वेतवर्णाला घेऊन येतो ) मंगळवेढयाचा हा जासूद खलिता घेऊन आला आहे. [ हातांत खलिता देतो.

**बाद०**--- मिठू, याला हिंदूकडून शिधा पाणी दे. मंगळवेढयाला पोहोंचेपर्यंत पुरेशी तरतूद करून दे.

**मिठू०**---जी-हां-हुजूर. चलो मंगळवेढयाचे पाहुणे बेदरच्या बादशाही पाहुणचाराला. [ दोघे जातात.

**बाद०**---कादर, जा पहाऱ्यावर बैस.

**कादर०**---हां-जी-हुजूर. [ जातो.

**बाद०**---मंगळवेढयाला काय ही साडेसाती लागली आहे तें एक खुदा जाणे. लोकांच्या पोटाला बसतो चिमटा पण खजिन्याला पडतो तोटा. टाकलें तर शापतें आणि खाल्लें तर बाधतें, काय करावें!

**कादर०**---हुजूर मंगळवेढयाचा जासूद आला आहे.

**बाद०**---जा त्याला आंत घेऊन ये. काय भानगड आहे. एक जासूद एका बाजूनें दाराबाहेर होतो तोंच दुसरा जासूद दूसऱ्या बाजूनें दारांत पाय ठेवतो.

**गोकर्ण**---सरकार, मुजुमदारांनीं अगदीं खासगी म्हणून हा खलिता दिला आहे.

**बाद०**---कादर, जा खाण्यापिण्याची व्यवस्था करवून यांची रवानगी कर.

**कादर**--हां-जी-हुजूर. चला पाहुणे पाहुणचाराला. [ जातात.

**बाद०**—काय ? मंगळवेढयाचे विश्वासू कारभारी बेमान झाले. सरकारी धान्याची आमच्या परवान्याशिवाय लूट करून खजिना ओस केला. बेमान. कोण आहेरे बाहेर.

**मिठू**—जी-हां-हुजूर मी आहें.

**कादर**—जी-हां-हुजूर हजर आहें.

**बाद०**—कादर, कलमदान आण ( तो सामान आणतो व खलीता लिहून देतो. ) हा खलीता घेऊन मंगळवेढयाला जा. आणि तेथल्या निमकहराम दामाजीला हा खलिता दाखवून काढण्यांनीं बांधून पायीं चालवीत येथें आणा. तो बादशहाचा गुन्हेगार आहे. कामांत कसूर झाली तर एकेकाची मुंडी मुरगळली जाईल याची याद राखा चला उचला पाय.

**कादर**—हां-जी-हुजूर, ( स्व. ) काम फत्ते करीन तर कादर म्हणून नांव सांगेन.

**मिठू**—हां-जी-हुजूर, ( स्व. ) काम फत्ते झालें नाहीं तर मिठू हें मिठास नांव मरेपर्यंत सांगणार नाहीं. [ जातो.

**बाद०**—वारे विश्वासू नोकर. पण याद राख या बेदरच्या बादशहाशीं गांठ आहे. बेदाद केल्या कामाबद्दल बोकडासारखा बुकलीन.

**विठूधेड**—जोहार-जोहार-जोहार मायबाप सरकार जोहार ! खजीन्याची भरपाई करायला गाडया भरून गल्ला आणला आहे त्यांतून हिशोबानें होणारे दाम कापून, बाकीचा पंतांना परत करा. या लखोटयांत हिशोबासह तपशीलवार मजकूर नमूद आहे.

पद

धनी माझा गुन्हेगार नाहीं सरकार हो
देवाजीचा कोप जहाला उडला हाहा:कार हो
दुष्काळानें कहर गुदरला उडला हाहा:कार ॥ धृ ॥
धान्य लुटविलें जीव जगविले केलें पुण्य अपार हो
नांव धन्याचे अमर कीर्तीचा परी धनी सरकार हो
खलीता वाचून दाम दुपटीनें रकम घ्यावी सरकार हो ॥

सरकार, तुमच्या नांवाची इज्जत राखणाऱ्या विश्वासून नोकराच्या गळयाल तुम्हींच नख लावावं. वारे जगाचा न्याय !

बादशहा०—खुदा राखो मेरी लाज ! या अल्ला परवर दिगार, मला क्षमा कर ! मींच खरा अन्यायी आहें. पण तू कोण. तुझें नांव-गांव-धंदा बोल बोल लवकर !

विठूधेड०—मी दामाजी पंतांच्या पागाचा पाईक. माझें नांव विठूधेड, मी मंगळपेढयाचा रहाणारा माझा धंदा देवाचें नांव घेणें. पण सरकार अजून तरी नका करू अविचार.

बादशहा०—विठू, चल ! वाऱ्याच्या वेगानें मंगळवेढा गाठूं. निमकहराम मुजुमदाराच्या मजलशीनें कैद केलेल्या दामाजीपंताला आधीं मुक्त करून त्याची मला क्षमा मागुंदे.

---

## प्रवेश आठवा

[ दामाजींपंताचें घर. दामाजीपंत परमेश्वराचें चिंतन करीत आहेत. इतक्यांत मुजुमदार विठू-कादर-गोकर्ण. प्र. क. ]

मुजुमदार०—अहाहा ! आतां माझ्यासारखा जगांत मी एकटाच. आतां मला कशाची पर्वा नाहीं एकच ध्यास, सत्ता आणि स्वार्थ. पाप आणि पुण्य–स्वर्ग आणि नरक–न्याय आणि अन्याय सबझूट आहे. ए. बेदरी बैलानों, पकडा त्या दामाजीला. आतां एथून पाय काढावा [ जातो

गोकर्ण०—अधमाधमा, खाल्लयाघरचे वासे मोजलेस काय ? पण ध्यानांत ठेव. पापाचे घडे भरतांच हाच बादशहा, तुला सुळावरहि लट-कविण्यास मार्गेपुढें पहाणार नाहीं.

कादर०—मिठू भाई, हो पुढें खलिता दाखवून दामाजीच्या दंडाला रश्शी खेंच.

मिठू०—हें तर बडें पाप आहे. देवाचें नांव घेणाऱ्याला कैद केला तर खुदाला राग येईल.

कादर०—पण नोकरी करायची आहे ना. मग पोटासाठीं पोटचें आडवे आलें तरी कापलें पाहिजे. म्हणे खुदा रागावेल. मग या मूठमूठ वाढलेल्या मिशा उपटून बुरखा घे.

मिठू०—ठीक आहे. कोण आहे घरांत. आम्ही बादशाचे नोकर, दामाजीपंताला पकडून बेदरला नेण्यासाठीं आलों आहोंत. ए लंबकर्णा कीं गोकर्णा, हा खलिता दे तुझ्या धन्याला.

दामाजीपंत०—[ लखोटा वाचून ] मी बेमान बनून सरकारी धान्याची चोरी केली. भयंकर गुन्हा केला ! म्हणून मला कैद करून नेण्यासाठीं हे राजदूत आले आहेत. ठीक आहे. विठू माऊली ! माझें सदाचरण, राजदृष्टीनें मला गुन्हेगार ठरवून गिरफदार करीत आहे. माणूस माणुसकीला मुकला तरी देव देवपणाला जागाच असतो. याची साक्ष देणें आपल्या शिरावर आहे. राजदूतानों चला. मात्र जातांना पांडुरंगाचें मला अखेरचें दर्शन घ्यावयाचें आहे. [ जातात.

---

## प्रवेश नववा

### पंढरपूर.

[ दामाजीपंत, गोकर्ण, मिठू, कादर ]

दामाजीपंत०—बादशहाच्या एकनिष्ठ व विश्वासू नोकरांनों, मी चंद्रभागेचें स्नान करून व पांडुरंगाचें दर्शन घेऊन येतों. [ जातो

मिठू०—कादरभाई, बेदर सोडल्यापासून जिवाला आराम वाटण्यासाठीं जगांत पैदा झालेली एकच दवाई, निशा मिळाली नाहीं. पण अगदीं वेडया पिशासारखें झालें आहे.

गोकर्ण०—ऊठ–बस; दिवस, रात्र, निशा–निशा–निशा ! काय मौज आहे पहा या बेदरी बैलांची.

श्वेतवर्ण०—[ प्र. क. ] गोकर्णा, पण जपून वाग यांच्याशीं नाहींतर शिंगे किंवा शेपटी झटकायला हे मागें पुढे पहायचे नाहींत.

कादर०—मंगळवेढयाच्या म्हसोबानों, घबरोमत. आपण सारे भाई, भाई, मग कशाला पाहिजे हातघाई.

श्वेतवर्ण०—बाता बस् करा. निशाबाजीचा बडेजाव थांबवा. बेदरहून बादशहा आतां येथें येईल.

मिठू–कादर०—हुषारीनें–सावधगिरीनें–सरसावून तयार रहाणें.

दामाजीपंत०—[ प्र. क. ] अद्भूत चमत्कार म्हणू ! कीं यक्षिणीची कांडी फिरली म्हणू ! मी जागा आहें कीं स्वप्नांत आहें ! हें सत्य आहे कीं आभास आहे ! गीतेमध्यें बादशाही मोहोर असलेली पावती कशी आली ! पैशांचा भरणा कोणी केला ! माझा चाकर विठूधेड कोण बापा पांडुरंगा, माझ्यासारख्या मर्त्यमानवाला, नाहीं या कोडयाचा उलगडा होत.

बादशहा०—[ प्र. क. ] मिठू, कादर, दामाजीपंताला मोकळा करा. खरा गुन्हेगार बदमाष, तो मजुमदार आहे. त्याला काढण्यानीं खेंचून आसुडानीं फटककीत आणा चला पाय उचला जलदी. पतांच्या नोकरांना पण बरोबर न्या. [ चौ. जा. ] दामाजीपंत, मला क्षमा करा. मीच तुमचा अपराधी आहें. पण विठू कहां है ! विठू–विठू–विठू कोठें गेला ! आतां एथें होता.

दामाजीपंत०—बादशहा, मुजुमदारांनीं काय केलं. विठूची काय भानगड झाली. आपण एथें कशाला आलांत. मी गुन्हा करून फरारी होईन असें वाटलें काय आपल्याला.

बादशहा०—पंत, गोरगरीब रयतेच्या तोंडांत, भुकेसाठीं तडफडून प्राण सोडणाच्या वेळीं अन्नाचा घास घालून त्यांस जगविलांत. म्हणूनच बेदरच्या बादशहाला, आपलें उज्वल तोंड जगांत दाखवावयाला जागा ठेवलीत. पण निमकहराम नापाक मुजुमदारानें तुमच्याबद्दल हा खलिता मजकडे पाठवून तुमचा मी अपराधी होण्याचें आणि दुनियेंत नालायक, नादान ठरण्याचें हें अधम कृत्य माझे हातून घडवून माझे तोंडाला काळें लावण्याची पाळी आणिली होती. अशा वेळीं तुमच्या व आमच्या पुण्याईनें तो अनर्थ टाळण्यासाठीं धांवून येणारा तो विठूधेड कोठें आहे !

दामाजी०—बादशहा, मीच मोठ्या बुचकळयांत पडलों आहें. या विठूची भानगड काय आहे ती माझी मलाच समजत नाहीं.

बादशहा०—दामाजीपंत, असें कसें म्हणतां. पायांत वहाणा, खांद्यावर कांबळी, डोक्याला मुंडासें, कपाळीं पांढऱ्या गंधाचा टिळा, हातांत काठी, गळयांत काळा दोरा, महाराची बोली, नांव विठूधेड. असा तुमचा तो विश्वासू चाकर, दरबारीं पैशांची भरपाई करून माझ्याबरोबर तुम्हांला

देण्यासाठीं पावती घेऊन बेदरपासून एथवर माझेबरोबर आला आणि एथच्या एथें आतांच्या आतां, नाहींसा झाला. तो विठूधेड मला भेटवा. विठू–विठू–विठू तू कोठें आहेस बोल ! मी अगदीं वेडा झालों आहे.

दामाजी०—झाला सान्या कोडयाचा उलगडा ! देवा पांडुरंगा ! माझ्यासारख्या पामरासाठीं स्वतः धेडाच्या स्वरूपांत बेदरला जाउन पैशांची भरपाई केली ना ! विठू माऊली ! एवढे सायास कशाला घेतले, नको ! आतां यापुढें पोटापाण्यासाठीं या नोकरी धंद्याचा व्याप–ताप, आणि संताप ! सर्व संग परित्यज्य । मापेकं शरणं व्रज ॥ यानुसार शेष आयुष्य भगवत् चिंतनांत घालवावें हीच माझी भावी कालक्रमणा.

बादशहा०—दामाजीपंत, मला एकदां त्या विठूधेडांचे दर्शन द्या मी अगदीं वेडा झालों आहें. विठू–विठू–विठू, कोठें आहेस बोल. मला एकदां भेट दे. दामाजीपंत या लाचार बादशहाला एकवार भीक घाला.

दामाजीपंत०—पतितपावना–पांडुरंगा ! बादशहाची इच्छा पूर्ण करून माझी लाज राख. विठू माऊली लेकराची आली आपण नाहींतर कोणीं पुरवावयाची.

पद

धांव पाव राखी लाज
लेकरूं मी दीन पाही
जीव तळमळे माय विठाई ॥ धृ ॥
ध्यान करीत मी निशिदीनी निरलस
बांधीली पूजा तूं प्रभू माझा
हेची दान सदा दे ठाव पाई ॥

बादशहा पहा त्या मूर्तीकडे [ पंढरीच्या जागीं विठूधेड बादशहास व दामाजींस दिसून अदृश होतो. ]

**बादशहा०**—अहाहा ! धन्य दामाजीपंत ! धन्य, धन्य पढरपूर ! ! धन्य धन्य पांडुरंग ! धन्य धन्य हा तुमचा हिंदुधर्म ! !

[ कैदी–मुजुमदार व सर्व प्र. क.

**मिठू०**—हां–जी हुजूर–बदमाष मुजुमदाराला कैद करून आणला आहे.

**कादर०**—हुजूर गुन्हेगार गिरफदार करून पुढें उभा केला आहे.

**श्वेतवर्ण०**—का मुजुमदार कशी झाली ? उंस गोड लागला तरी मुळांसकट खाऊं नये म्हणतात तें यासाठीं बरं.

**गोकर्ण०**—कसलेल्या कमलाच्या हातकडया झाल्या याला कारण खाल्लया घराचे वासे मोजणें काय समजलं–ह !

**मुजुमदार०**—मला क्षमा करा. कृतकृत्याचा मला पूर्ण पश्चात्ताप झ ला आहे.

**बादशहा०**—स्वार्थसाठीं संन्याशाला सुळीं देणाऱ्या अधमा, माझ्या तोंडाला काळें फासू पहातां अखेर आपलेंच तोंड कसें काळें केलेंस पहा. दयेच्या दानाला तू अपात्र आहेस.

**दामाजी०**—बादशहांनीं माझ्या शब्दाखातर एक वेळ क्षमा करावी. मुजुमदार तुमची इच्छा माझेजवळ बोलून सहज साध्य झाली असती. त्यासाठीं असलें निंद्य वाममार्ग योजण्याचें कारण नव्हतें.

**गोकर्ण०**—याला म्हणतात दयाळूपणा–काय समजलं–हं !

**श्वेतवर्ण०**—मुजुमदार, धरा पतांचे पाय आणि व्हा पतित पावन.

**बादशहा०**—एवढी तरी माणुसकी अंगीं आहे कीं नाहीं. कुणाला ठाऊक.

मुजुमदार०—पंत, मी सर्वस्वीं शरण आहे. कृतापराधांची क्षमा करा.

दानाजीपंत०—त्या दीन दयाघन पांडुरंगाला शरण जा. देवाची दया अमोल आहे.

मिठू०---माझें तखदीर थोर म्हणून आज आम्हांला बडा संत भेटला. पंडितजी मी आपणाला कुर्निसात करीत आहे.

कादर०---मीहि कुर्तिसात करतों.

दामाजी०---अहाहा! खरोखरच आजचा शुभप्रसंग, मोठया भाग्याचा गणला पाहिजे! बा मानवा, कोणत्याहि आणि कशाहि परिस्थितींत असलास तरी हृदयामध्यें सद्भावनेनें हरिचिंतनाचा "**नंदादीप**" सदैव जागृत ठेव. पांडुरंगा, तुझ्या नाम गजरांत माझ्या हृदयींचा "**नंदादीप**" सदा उज्वलींत राहूं दे. हीच माझी मागणी आहे.

**पांडुरंग--पांडुरंग--पांडुरंग !!!**

**हरी ओम् तत्सत्.**

---

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
९६५३

समारंभाकरितां अत्यंत मोहक व टिकाऊ वासाचें

( र जि स्ट र्ड )

## अत्तर " लठ्ठ "

## वापरून मनें प्रफुल्लित ठेवा

त्याशिवाय इतर सुगंधी माल खात्रीलायक मिळतो.

गजानन जनार्दन बोडस अत्तरवाले

ठाकुरद्वार मुंबई नं. २

—: स्वस्ताईची कमाल :—

# श्री. महालक्ष्मी क्लॉथ स्टोअर्स

आमचे येथें लुगडीं, खण, पातळें, धोतरजोडया व फॅन्सी कापड मार्केट भावानें मिळतें. एकवार खात्री करा.

पत्ता:—

ठाकुरद्वार राममंदीर बिल्डिंग, मुंबई नं. २

" एकवार अवश्य भेट द्या. "

श्री कालभैरव प्रसन्न

स्थापना १९३५

# टोळकर ब्रदर्स

सोनें व चांदीच्या दागिन्याचें व खरें कल्चर्ड मोत्यांचे व्यापारी.

आमचे येथें प्रेझेंट देण्यालायक फॅन्सी मेडल्स वगैरे मनपसंत माल मिळेल.

पत्ताः—तुळशीदास मोहनजी बिल्डिंग नं. ५
मुगभाटलेन मुंबई नं. ४

तऱ्हेतऱ्हेचे चमचमीत व

# स्वादिष्ट मसाले

रुचकर व लज्जतदार

# लोणचीं पापड

व औषधी उपयोगाकरितां

## उत्तम मोरंबे

तयार करणारः—

व्ही. पी बेडेकर ॲण्ड सन्स मसालेवाले

दुकान—मुगभाट, ठाकुरद्वार, दादर, कोट व परेळ.

श्रीराम प्र.

# "दि यंगमेन्स नाईट-स्कूल"

केवळ लोकाग्रहास्तवच ही शाळा, आम्ही तारीख १ जून १९३८
पासून सुरूं केली आहे. ह्या संस्थेंत

## १ वर्षांत इंग्रजी पहिल्या तीन यत्तांचे

शिक्षण दिलें जाऊन, पुढील यत्ता वर्षास एक प्रमाणें, केल्या जातात.

## अवघ्या दोनच महिन्याच्या अवधींत

विद्यार्थ्यांचा आकडा १२५ सव्वाशेंवर गेलेला आहे. ह्यावरून या शाळेंत किती उच्च दर्जाचें व काळजीपूर्वक शिक्षण दिलें जातें, ह्याची कल्पना वाचकांचे सहजच ध्यानांत येईल.

## वेळ रात्रौ ८ ते १०

वरील संस्थेनेंच **दि मॉर्निंग-स्कूल** ह्या नांवाची सकाळची मुलामुलींची शाळा सुरूं केली आहे. ह्या शाळेंत एका वर्षात इंग्रजी तीन यत्ता केल्या जात असून, पुढील यत्ता वर्षास एक याप्रमाणें केल्या जातात.

विशेष--सूचना

गरीब व होतकरूं शिक्षणेच्छूंना मोफत शिक्षण दिलें जाईल.

हेडमास्तर

पत्ताः--**प्रोप्रायटरी ऍण्ड फोर्ट हायस्कूल** दुसरा मजला
कोलभाट स्ट्रीट नाका, चिराबजार मुंबई नं. २

# दिगंत छाप ( रजिस्टर्ड )

—प्रमाणबद्ध क्रियाशुद्ध—

# काळी टूथ पावडर

दांत दुखी, नेहमी हिरडया व दाढ सुजणें, दातांतून रक्त व पू येणें हीं सर्व पायोरियाचीं दुष्ट चिन्हें आहेत. म्हणून त्यांचा शिरकाव न होऊं देण्यासाठीं दिगंत छाप काळी टूथ पावडरच वापरा. याच्या योगानें दांत पांढरे स्वच्छ राहून हिरडया बळकट होतात.

सोल एजंटस——मॉडेल केमिस्टस


REFBK-0005773

REFBK-0005773


आमचे येथें ज्यो… काम केलें जातें.

जन्मवेळ कळविल्यास टिपण करून देऊं.

भेटा अगर लिहा:—

ज्योतिषी——सिताराम बाळकृष्ण जोशी.

३१६ ई हेमराजवाडी खोली नं. ५

भेटण्याजी वेळ—सकाळीं ७ ते १० व सायंकाळीं ६॥ ते ८॥